# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 July 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ जूलै २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- ग्रूप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर सुखरूपपणे दाखल
- महाराष्ट्र देशात इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमतेचं सर्वात मोठ राज्य ठरेल–टेस्लाच्या उद्घाटन सोहळ्यात मुख्यमंत्र्यांकडून विश्वास व्यक्त
- अनधिकृत कत्तलखान्यांवर तातडीनं कारवाईचे निर्देश देणार–मंत्री उदय सामंत यांची ग्वाही

आणि

- छत्रपती संभाजीनगरात वाहनतळ सुनिश्चित करण्यासाठी जीआयएस तंत्रज्ञानाचा वापर

****

ॲक्सिओम फोर मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेले भारतीय अंतराळवीर ग्रूप कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांचे सहकारी आज भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी तीन वाजता पृथ्वीवर सुखरूपपणे परतले. या अंतराळवीरांना घेऊन आलेलं ड्रॅगन कॅप्सुल हे छोटं अंतराळ यान, सुमारे तेवीस तासांच्या प्रवासानंतर कॅलिफोर्नियाच्या जवळ प्रशांत महासागरात यशस्वीपणे उतरलं. या मोहिमेत शुक्ला यांनी १८ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात मुक्काम केला. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी, हे अंतराळवीर काही दिवस विलगीकरणात राहणार आहेत.

शुभांशु शुक्ला यांच्या ऐतिहासिक अवकाश मोहिमेहून परतण्याचं आपण सर्व देशवासियांसह स्वागत करतो, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. शुक्ला यांची ही मोहीम म्हणजे भारताच्या गगनयान या मानव अंतराळ मोहिमेच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं पंतप्रधानांनी यांनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी ग्रूप कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं अभिनंदन केलं आहे. भारताच्या सुपुत्राच्या यशस्वी मोहिमेनंतरचा हा क्षण देशासाठी अभिमानाचा क्षण असल्याची भावना, सिंह यांनी व्यक्त केली, ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह**

अंतराळवीरांचं कॅप्स्यूल पृथ्वीवर सुखरूप उतरल्यानंतर लखनौ इथं शुक्ला यांच्या घराजवळ त्यांच्या आईवडिलांसह सर्व नागरिकांनी जल्लोष केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही समाज माध्यमावरच्या संदेशातून शुक्ला यांचं अभिनंदन करत, त्यांची ही कामगिरी देशातल्या तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

****

महाराष्ट्र देशातलं सर्वात मोठं इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेलं राज्य ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. आज मुंबईत टेस्ला एक्सपिरियन्स सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. टेस्लाचं जगप्रसिद्ध मॉडेल, "Model Y" आज भारतात लाँच करण्यात करण्यात आलं. राज्य सरकार इलेक्ट्रिक गाड्यांसाठी धोरणात्मक प्रोत्साहन देत असून, भविष्यातील ग्रीन मोबिलिटीचा केंद्रबिंदू महाराष्ट्र ठरणार असल्याचं फडणवीस यांनी स्पष्ट केलं. आपल्या भाषणात मुख्यमंत्री म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

कुष्ठरोग निर्मूलनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राज्यस्तरीय समिती स्थापन केली जाणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली आहे. ही समिती दर तीन महिन्यांनी आपला अहवाल राज्य सरकारला सादर करणार आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत इथल्या बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्रासाठी मंजूर निधीसह वाढीव निधी टप्प्याटप्प्याने दिला जाईल, असं अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितलं. आगामी अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी अधिकाधिक निधी देण्याची ग्वाही जयस्वाल यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वा ल**

रोहयो फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी यावर उत्तर देतांना, या प्रकल्पाच्या उभारणीसाठी शासन पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली. हेमंत पाटील यांच्या लक्षवेधी सूचनेवर अंबादास दानवे, अनिल परब, राजेश राठोड, भावना गवळी, तसंच प्रवीण दरेकर यांनी सहभाग घेऊन सूचना केल्या.

****

जलयुक्त शिवार योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप सदस्य कैलास पाटील यांनी केला, ते आज विधानसभेत बोलत होते. सरकारी निधीचा राजरोसपणे अपहार होत असल्याचा आरोप पाटील यांनी केला, ते म्हणाले –

**बाईट – आमदार कैलास पाटील**

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड शहराला पाणीपुरवठा नियमित आणि योग्य प्रमाणात व्हावा यासाठी अंबाडी योजना तसंच शिवना टाकळी मध्यम प्रकल्प, अशा दोन्ही योजनांचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्रालयात आज यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

****

परभणी जिल्ह्यातल्या पिकांसाठी जायकवाडी धरणातून तत्काळ पाणी सोडण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. आज विधान भवनात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. मंत्र्यांच्या निर्देशानुसार, जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून उद्यापासून माजलगाव धरणामार्फत परभणी जिल्ह्यासाठी पाणी सोडण्यात येणार आहे.

****

पंढरपूर इथं आषाढी यात्रेच्या सोहळ्यानंतर केली जाणारी श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेची प्रक्षाळ पूजा उद्या बुधवारी होणार आहे. मंदिर व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी ही माहिती दिली. प्रक्षाळपूजेनिमित्त दर्शनाच्या वेळांमध्ये उद्या बदल होणार आहे.

****

शबरी घरकुल योजनेचा लाभ अनुसूचित जमाती प्रवर्गातल्या व्यक्तींना मिळावा, यासाठी शासन कटिबद्ध आहे, असं आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी म्हटलं आहे. आज विधान परिषदेत सदस्य अभिजित वंजारी यांच्या प्रश्नावर ते उत्तर देत होते.

****

अनधिकृत कत्तलखान्यांवर तातडीनं कारवाईचे निर्देश पोलिसांना देणार असल्याचं, मंत्री उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत सांगितलं. आमदार विक्रांत पाटील यांनी, मालेगाव इथं अवैध कत्तलखान्यांमधलं रक्तमिश्रित पाणी, नदीत सोडलं जात असल्याबाबतची लक्षवेधी सभागृहात उपस्थित केली, त्याला ते उत्तर देत होते. महानगरपालिकेच्या अधिकृत कत्तलखान्यातच कत्तल करण्यास परवानगी असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.

****

राज्यात लागू करण्यात आलेल्या गोवंश हत्या बंदीच्या कायद्याच्या विरोधात बीड जिल्ह्यात शेतकरी आणि कुरेशी समाजाने आंदोलनाचा इशारा दिला आहे. या कायद्यामुळे भाकड जनावरं विक्री करण्यात अडचणी येत असून, हा कायदा फक्त गोरक्षकांचा विचार करून लागू करण्यात आल्याचा आरोप आंदोलक करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगरमध्ये वाहतूक कोंडी आणि वाहनतळाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेतला आहे. यासाठी जीओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टीम– जीआयएस तंत्रज्ञानाचा वापर करून शहरातील प्रमुख रस्त्यांचे मॅपिंग करण्यात येणार आहे. शहरातील मुख्य बाजारपेठा आणि गर्दीच्या रस्त्यांवर वाहनतळासाठी जागा निश्चित केल्या जातील, नागरिकांना ॲपच्या माध्यमातून आपल्या घरातूनच वाहनतळावरची जागा आरक्षित करता येणार आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या अंबड इथला ग्राम महसूल अधिकारी श्रीपाद देशपांडे याला चार हजार रुपयांची लाच घेताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं आज रंगेहाथ अटक केली. तक्रारदाराच्या प्लॉटची फेर नोंद घेण्यासह अन्य दाखले देण्यासाठी देशपांडे यानं ही लाच मागितली होती.

****